विश्व मराठी परिषद आणि भीष्म स्कूल ऑफ इंडिक स्टडीज

अमेरिकेतील मराठी बंधु-भगिनींसाठी

# पौरोहित्य परिचय अभ्यासक्रम
# ऑनलाईन

* १९ ऑगस्ट ते १० डिसेंबर २०२३

दर शनिवार – रविवार

PT: 8:45 to 10:15am

ET: 11:45am to 1:15pm





आचार्य

## सोमयाजी सुहोता आपटे अग्निहोत्री

आपटे घराण्याला २०० वर्षांची
पौरोहित्य आणि याज्ञिकी परंपरा

## ऑनलाईन प्रवेश घ्या

- स्वयं पुरोहित बना
- षोडषोपचार पूजा विधान
- गणेश स्थापना, घटस्थापना करा
- पूजा पद्धती – उपासना पद्धती
- झूमद्वारे लाईव्ह क्लास
- रेकॉर्डिंग उपलब्ध

नोंदणीची अखेरची तारिख : १२ ऑगस्ट

Accredited in the USA by IACDSC
Useful for Employment in USA

महिला-पुरुष सर्वांना प्रवेश
वयोमर्यादा : वय वर्ष १२ च्या पुढे
मर्यादित जागा । त्वरित प्रवेश घ्या

अधिक माहिती व नोंदणीसाठी

www.vishwamarathiparishad.org/paurohityaparichaya

+1-6503151128


+1-6508105252

# पौरोहित्य अभ्यासक्रम

भारतीय समाज पिढ्यानपिढ्या धार्मिक प्रवृत्तीचा आहे. भारतीय जीवन परंपरेचा पाया म्हणजे सनातन वैदिक संस्कार आणि संस्कृती आहे. देवतापूजन, उपासना आणि पूजा पद्धती हा एकूणच भारतीय माणसाचा स्थायीभाव आहे. दैनंदिन पूजा तसेच नैमित्तिक पूजा हा भारतीय कुटुंब व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे. पूर्वीच्या काळी आणि काही कुटुंबांमध्ये आजही दैनंदिन पूजन हा दिनचर्येचा एक अविभाज्य भाग होता. भारतीय मानस मुळातच श्रद्धाळू आणि आस्तिक मनोवृत्तीचा आहे. पृथ्वीवर आपले वास्तव्य असताना सर्व प्रकारच्या अधिभौतिक आणि अधिदैविक शक्तींची आपल्यावर कृपा असावी, त्यांचे आशीर्वाद आपल्याला मिळावेत आणि आपले जीवन सुखमय, आनंदमय आणि चैतन्यमय व्हावे अशी धारणा आहे. देवतांची पूजा आणि उपासना मनाला, बुद्धीला आणि चित्ताला अपार आनंद देणारा अनुभव आहे. त्यातून होणारे एका प्रकारचे ध्यान आणि पूजेमध्ये रममाण होणे हा अत्युच्च आनंद आहे. वैयक्तिक पूजा आणि सामूहिक पूजा पारंपरिक पद्धतीमध्ये विकसित होत गेल्या. त्यातूनच पूजा आणि उपासना तंत्रातील तज्ज्ञ अशा पुरोहित किंवा भटजी यांच्या सहकार्याने वैयक्तिक यजमान म्हणून आपल्या घरांमध्ये तसेच सामूहिक पूजा करण्याची परंपरा निर्माण झाली. वेदपाठशाळेतून खडतर प्रशिक्षण घेतलेले पुरोहित यांनी ही परंपरा पुढे विकसित केली जी आजही निरंतर सुरु आहे.

आज भारतीयांनी विविध क्षेत्रांमध्ये खूप मोठी प्रगती केली आहे. सातासमुद्रापलीकडे म्हणजे अमेरिका, युरोप, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आदि खंडांमध्ये त्यांनी वास्तव्य केलेले आहे. काळाच्या या प्रवाहामध्ये गतिमान जीवनपद्धतीमुळे दैनंदिन पूजा आणि उपासना यांची आपली थोडी फारकत झाली आहे. विशेषतः अमेरिकेसारख्या देशामध्ये नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने वास्तव्य करून असलेल्या मराठी बांधवांना याची निकड जाणवत आहे. सत्यनारायण पूजा, वास्तूशांत, विवाह, गृहयज्ञ, नक्षत्रशांती इ. साठी मराठी पुरोहित मिळणे थोडे अवघड झाले आहे.

प्रा. क्षितिज पाटुकले यांच्या संकल्पनेतून विश्व मराठी परिषद आणि भीष्म स्कूल ऑफ इंडिक स्टडीज यांनी ऑनलाईन पौरोहित्य अभ्यासक्रम सुरु करण्याचे ठरवले आहे. प्रख्यात विदुषी, व्यासंगी प्रवचनकार आदरणीय कल्याणीताई नामजोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यासक्रम तयार केला आहे. प. पू. स्वामी गोविंददेवगिरि महाराज, कोषाध्यक्ष, श्रीरामजन्मभूमी न्यास, अयोध्या यांचे आशीर्वाद या उपक्रमासाठी लाभले आहेत. अमेरिकेतील सुप्रसिद्ध कीर्तनकार सौ. रश्मीताई बर्वे आणि त्यांचे यजमान श्री. नितीन बर्वे यासाठी समन्वयाचे काम पाहणार आहेत.



आशीर्वाद
प.पू. स्वामी गोविंददेवगिरि महाराज



मार्गदर्शक
डॉ. कल्याणीताई नामजोशी



संकल्पना
प्रा. क्षितिज पाटुकले

## अभ्यासक्रमाची माहिती :

**ऑनलाईन पौरोहित्य अभ्यासक्रम एकूण दोन स्तरावर चालणार आहे.** १) परिचय स्तर २) प्रविण स्तर. परिचय स्तरावरील अभ्यासक्रमाची दुसरी बॅच १९ ऑगस्ट २०२३ पासून सुरु करीत आहोत. हा अभ्यासक्रम पुराणोक्त पद्धतीवर आधारित आहे.

## परिचय स्तर अभ्यासक्रमातील समाविष्ट घटक :



१) पूजा व उपासना - व्याख्या आणि उद्दिष्टये

२) नवविधा भक्ती

३) पौरोहित्य संकल्पना

४) षोडपोचार पूजा पद्धती आणि पूजा साहित्य आणि पूजेची तयारी

५) पूजा विधान - संकल्प, आवाहन, प्रतिष्ठापना, समाप्ती

६) विविध उपास्य देवतांची ओळख, त्यांचे वैशिष्ट्य

७) संस्कृत अक्षर आणि भाषा ओळख

८) संस्कृत प्राथमिक उच्चार ओळख आणि संथा

९) गणपती अथर्वशीर्ष भाग - १ व भाग - २

१०) श्री गणेश प्रतिष्ठापना, गौरी प्रतिष्ठापना, विसर्जन, घटस्थापना, कुमारीपूजन इ.

११) विविध व्रते आणि वैकल्ये, आरत्या, चार्तुमास, सण आणि उत्सवांची ओळख

१२) गोत्र, कुलदेव, कुलदेवता, कुलोपचार, कुलोपासना

१३) घरची रोजची पूजा तसेच नैमितिक पूजा

१४) पाठांतर + उजळणी

१५) ऑनलाईन परीक्षा



## आचार्यांची ओळख

**पू. श्री. सोमयाजी सुहोता आपटे.**

राहणार म्हापसा, गोवा

यांच्या घरी गेली ६० वर्षे अविरत श्रौत अग्निहोत्र सेवा चालू आहे. त्यांनी कवळे, गोवा येथील वेद पाठशाळेत ५ वर्षे अध्ययन केले आहे. त्याशिवाय यजुर्वेद शाखा अध्ययन केले आहे. त्यांचे संस्कृत शिक्षण झालेले आहे. म्हापसा गावचे ते ग्रामपुरोहित आहेत. म्हापसा येथे त्यांचे घराणे २०० हून अधिक वर्षे वंशपरंपरेने पौरोहित्य आणि याज्ञिकी करीत आहे. सुहोताजी तोच वारसा पुढे चालवत आहेत. त्यांच्या घरातच अग्निहोत्र, देशी गाई आणि छोटेसे परशुरामांचे मंदिर आहे. त्यांची पत्नी त्यांना या कार्यात आत्मीय आणि सक्रिय सहकार्य करीत आहे. **नुकताच गोव्यामध्ये सकाळ माध्यम समूहाने सोमयाजी सुहोता आपटे अग्निहोत्री यांच्या मुख्य यजमान अधिपत्याखाली विश्वशांतीसाठी अग्निष्टोम महासोमयाग हा ६ दिवसांचा यज्ञ उत्सव ५ ते १० फेब्रुवारी दरम्यान आयो**

## परिचय स्तर पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना कोणती कौशल्ये प्राप्त होतील ?

१) संस्कृत भाषा, उच्चार यांचे प्राथमिक ज्ञान होईल

२) पूजा आणि उपासना पद्धती, नवविधा भक्ति यांची माहिती होईल

३) पूजेची तयारी कशी करावी, संकल्प कसा करावा आणि पूजा साहित्य कोणते लागते याचे कौशल्य प्राप्त होईल

४) विविध देवतांची ओळख व माहिती होईल आणि ती सांगता येईल

५) विविध स्तोत्रे आणि श्लोक यांचे पाठांतर होईल आणि अर्थ माहीत होईल

६) षोडोपचार पूजा पद्धतीची माहिती होईल, प्रत्यक्ष षोडोपचार पूजा करता येईल ( सोळा प्रकारची पूजा )

७) रोज घरची पूजा करता येईल

८) गणेशोत्सवामध्ये गणपती, गौरी प्रतिष्ठापना करता येईल

९) घटस्थापना करता येईल, कुमारीपूजन, कन्यापूजन, सरस्वती पूजन करता येईल

१०) विविध व्रते, सण, उपासना यांची माहिती होईल, नामस्मरण करता येईल

११) संस्कृत भाषेची संथा मिळेल. पुढे संस्कृत शिकता येईल

१२) आपल्या स्वतःच्या तसेच यजमानांच्या घरी पूजा करता येतील इ.

१३) कुलदेवी, कुलदेवता, कुलोपचार यांचे विषयी माहिती होईल, इतरांना माहिती देता येईल

१४) धार्मिक विधींबाबत मार्गदर्शन करता येईल, प्रबोधन करता येईल, व्याख्यान देता येईल

१५) अमेरिकेतील Certified पुरोहित म्हणून प्रोफेशन करता येईल.

## अभ्यासक्रम शुल्क :

**परिचय स्तर : Invitation Fees - USD 450/-**

प्रात्यक्षिकांसह ऑनलाईन मार्गदर्शन । ऑनलाईन परिक्षा

प्रत्येकाला प्रमाणपत्र । मर्यादित जागा । ऑनलाईन प्रवेश घ्या

**Zelle Code:** vmarathiusa@gmail.com

**Bank Transfer:** **Name:** Vishwa Marathi Parishad

**Account Number:** 7379475192 **Bank:** Wells Fargo

**Bank Address:** 2300 Homestead Road, Cupertino CA 95014

ऑनलाईन प्रवेशासाठी खालील लिंकवर क्लिक करा

**www.vishwamarathiparishad.org/paurohityaparichaya**

ऑनलाईन नोंदणीची अखेरची तारिख : १२ ऑगस्ट २०२३

## अभ्यासक्रम नियम :

- या अभ्यासक्रमातील सर्व सत्रे ऑनलाईन झुम मिटिंग द्वारे आयोजित केली जाणार आहेत.
- दिलेल्या वेळापत्रकामध्ये परिस्थितीप्रमाणे बदल करण्याचे अधिकार आयोजक तसेच मार्गदर्शकांकडे आहेत.
- एकदा केलेली नोंदणी कोणत्याही कारणामुळे रद्द करता येणार नाही तसेच भरलेली रक्कम परत करता येणार नाही. वर्ग सुरु होण्याच्या 4 दिवस अगोदर कळवल्यास बदली व्यक्ती देता येईल अथवा, भविष्यातील बॅच मध्ये अॅडजस्ट करता येईल.

- संपूर्ण माहिती आणि वेळापत्रक इ. वाचल्यानंतरच नोंदणी करावी.
- एकूण अभ्यासक्रमाचे स्टडी मटेरीयल ई-बुक स्वरुपात दिले जाईल.
- न्यायालयिन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयिन क्षेत्र हे हे राहील.

**अभ्यासक्रमात प्रवेश का घ्यावा ?**

- घरच्या घरी पूजा करता येईल
- संस्कृती परंपरा, सण, उत्सव यांची ओळख होईल.
- समांतर करिअर विकसित करायची संधी
- लहान वयातच आध्यात्मिक संस्कार
- पौरोहित्य करिअर म्हणून अमेरिकेमध्ये मोठी संधी
- संस्कृती आणि परंपरा यांचे संवर्धक म्हणून सामाजिक प्रतिष्ठा
- संस्कृत भाषा, पाठांतर, स्तोत्रपठण, अग्निहोत्र यामुळे आगळ्यावेगळ्या आनंदाची अनुभूती
- मंदिरे, धार्मिक सामाजिक क्षेत्र इ. ठिकाणी नोकरीची संधी

**संदर्भ ग्रंथ :**

१) लघुपूजाविधी - संपादक - प्रा. रा. ल. जोशी
२) नित्यकर्म - पूजा प्रकाश - पं. लालबिहारी मिश्र
३) अग्निहोत्र - वा. जो. आपटे
४) हवन पुस्तिका
५) अग्निहोत्र - पं. डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी
६) शांती विधान - मधुकर गो. अत्रे
७) यज्ञरहस्यम - बे. शा. सं. कृ. म. बापट शास्त्री
८) निधन शान्ति - प्रभाकर स. पाध्ये
९) चातुर्मास पुस्तिका
१०) कुलदैवत
११) कुळधर्म - कुलाचार - कुलदैवते - गजानन
खोले
१२) भारतीय रुढी व परंपरा इ.